# Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)

Peer Reviewed And Indexed Journal
ISSN 2349-638x
Impact Factor 8.02
Website :- www.aiirjournal.com

## Theme of Special Issue

## "Emerging Trends in Social Sciences , Language, Commerce and Management"

( Special Issue No.139 )

## Chief Editor

Dr. Pramod P. Tandale

## Editor

Mr. Pradip B. Patil
Assistant Professor,
Karmaveer Hire Arts, Science, Commerce & Education College, Gargoti

No part of this Special Issue shall be copied, reproduced or transmitted in any form or any means, such as Printed material, CD – DVD / Audio / Video Cassettes or Electronic / Mechanical, including photo, copying, recording or by any information storage and retrieval system, at any portal, website etc.; Without prior permission.

**Aayushi International Interdisciplinary Research Journal**

**ISSN 2349-638x**

Special Issue No.139

Oct. 2024

**Disclaimer**

Research papers published in this Special Issue are the intellectual contribution done by the authors. Authors are solely responsible for their published work in this special Issue and the Editor of this special Issue are not responsible in any form.

| Sr. No. | Name of the Author | Title of Paper | Page No. |
|---|---|---|---|
| 1. | **Dr. Asmita. M. Pradhan** | **Viksit Bharat 2047 - Challenges and Opportunities** | 1 |
| 2. | Mr. Shrikant Banda Desai | **Current Mental Health Issues and Social Work Interventions** | 4 |
| 3. | **Smt. Rupali Ganpatrao Bharmal** | **Factors And Activities For Teacher Personality** | 7 |
| 4. | **Dr. Arvind M. Chougale** | **Increasing Interpersonal Collaboration in Social Work** | 16 |
| 5. | **Mr. Chandrakant K. Chavan** | **Element of Crime and Mystery in Martin Amis's Novel 'Other People: A Mystery Story'** | 22 |
| 6. | Anita Powar | **Retelling of Shurpnakha's Myth: *Lanka's Princess* by Kavita Kane** | 25 |
| 7. | **Dr. Meenal Kishor Kshirsagar<br>Prof. Dr. Kishor S Nikam** | **Political Economy: An Approach towards International Trade Strategies** | 28 |
| 8. | **Dr. Sagar R. Powar<br>Mrs. Trupti Milind Patil** | **Scenario of Pradhan Mantri Mudra Yojana in India** | 33 |
| 9. | **Dr. Sanmati Vijay Dhanawade** | ***Kari*: First Graphic novel by an Indian woman writer** | 37 |
| 10. | **Digambar Laxmanrao Sangvikar** | **Emerging Trends in Commerce And Management in India** | 40 |
| 11. | **Dr. Santosh Tatyaso Birnale** | **Growth of Tourism and Its Impact on the Indian Economy** | 46 |
| 12. | **Dr. Vishwasrao Sadu Mane** | **Artificial Intelligence in Library and Information Science** | 50 |
| 13. | **Dr. Mane Vishwasrao Sadu** | **Role of Infrastructure Development Strategies for Modern Libraries** | 56 |
| 14. | **Dr.Shabana Gaibi Halangali** | **Uniform Civil Code Challenges and its Implementation** | 62 |
| 15. | **Prof.Komal Mahesh Kale** | **Indian Economy: Problem and Challenges** | 70 |
| 16. | **Mr. Sairaj Divakar Patil.** | **The Artificial Intelligence Revolution : Transforming of Technology and Society** | 76 |

| Sr. No. | Name of the Author | Title of Paper | Page No. |
|---|---|---|---|
| 17. | Mr. Shivaji Govind Sawant<br>Dr.R.K.Shelake | Recent Trends in Language and Literature | 79 |
| 18. | Prof. Satyajit Ramchandra Raje | Agricultural Extension System in Viksit Bharat: Challenges and Opportunities | 82 |
| 19. | Miss. Gautami Baswant Patil<br>Prof. Dr. Suchita Suragihalli<br>Shivtej S. Damame | Critical Analysis of Application of Artificial Intelligence in Commerce Management | 88 |
| 20. | Mrs. Jyoti Mohan Jadhav | Monica Ali Empowered Her Women in Her '*Brick Lane*' | 93 |
| 21. | Mrs. Bindya S. Rajratna | Role of Infrastructure in Development | 97 |
| 22. | Mr. Rajendra Uttamrao Doke<br>Dr. Leena S. Modi<br>Dr. Archana J. Mali | Role of Health Infrastructure in Development of India | 100 |
| 23. | Mr. Abhijit S. Misal | Artificial Intelligence in Branding | 106 |
| 24. | Rajendra Balkrishna Kamble | The Emergence of Blended Learning in Language Teaching: A Comprehensive Analysis | 110 |
| 25. | Mr. Gangadhar S. Mali,<br>Dr. Gurudatta S. Mhangore, | Nadia Hashimi's 'The Pearl That Broke Its Shell'. Bildungsroman: A novel of Formation. | 115 |
| 26. | Ramchandra Yashwant Medhekar | Cinematic Technique Emphasized with Visual Context of Action in the novels of Graham Greene (With special reference to "The Power and the Glory") | 117 |
| 27. | Jyoti Surajkumar Satavekar | Importance of English Language in Higher Education Under The Indian Nep 2020 : Role, Recommendation, Implementation. | 122 |
| 28. | Mrs. Madhuri Abaso Bhale | Gender Inequality Among Female Teachers in Zilla Parishad Schools of Kolhapur District | 126 |
| 29. | Mr. S. D. Rajratna | The Role of Media in Kishwar Desai's The Sea of Innocence | 129 |
| 30. | Dr. Ashok Madhavrao Waghmare | Role of Physical Fitness in Mental Welbeing | 133 |
| 31. | डा.संजय बजरंग देसाई | आधुनिक हिंदी कविताओं में चित्रित मानवीय मूल्य | 135 |
| 32. | प्रो. (डॉ.) भास्कर उमराव भवर | सोशल मीडिया का व्यवसायिक शिक्षा और समाज पर प्रभाव | 140 |
| 33. | डॉ. के.आर. पाटील | भूमंडलीकरण के परिप्रेक्ष में संदीप अवस्थी की कहानियों में वास्तविकता का चित्रण | 143 |

| Sr. No. | Name of the Author | Title of Paper | Page No. |
|---|---|---|---|
| 34. | प्रा. डॉ. अशोक बाळू पाटील | इक्कीसवीं सदी के हिंदी कथा साहित्य में चित्रित नारी की पीड़ा | 145 |
| 35. | कुमारी शकुंतला दशरथ कुंभार | ज्योत्स्ना मिलन की कहानिय़ों में चित्रित नारी का अंर्तद्वंद्व | 149 |
| 36. | कु. भाग्यश्री दादासाहेब चिखलीकर | नासिरा शर्मा के कथा साहित्य पर भूमंडलीकरण का प्रभाव 'संस्कृति' के विशेष संदर्भ में | 152 |
| 37. | डॉ. आर.एन. तहसिलदार | हिंदी नाट्य साहित्य और न्यायव्यवस्था | 155 |
| 38. | नदिम इकबाल मुल्ला | सोशल मीडिया का व्यवसायिक शिक्षा और समाज पर प्रभाव | 157 |
| 39. | प्रा.सुहानी सागर पाटील | इक्कसवी सदी के काव्य में चित्रित स्त्री विमर्श | 161 |
| 40. | विद्या आनंदराव जाधव | हिन्दी साहित्य और भूमंडलीकरण | 165 |
| 41. | श्री. संतोष साताप्पा कांबळे | महाविद्यालयीन छात्रों में कहानी लेखन का महत्व के प्रति दृष्टिकोण - अध्ययन | 168 |
| 42. | डॉ. जयसिंग मारुती कांबले | हरिशंकर परसाई के निबंधों में शैक्षिक व्यंग्य | 171 |
| 43. | डॉ.शशिकांत शामराव चव्हाण | गांधीवादातील साप्रांदायिकता | 175 |
| 44. | प्रा.प्रदिप बळवंत पाटील | शिक्षणातील एक नवीन विचारप्रवाह -डिजिटल साक्षरता आणि शिक्षण | 179 |
| 45. | डॉ. शहाजीराव धोंडीराम वारके | एक देश एक निवडणूक | 182 |
| 46. | श्रीम. एस. एस. पाटील<br>प्रो. डॉ. पी. एस. देसाई | शिक्षकाला वर्तमानपत्रांचा अध्ययन-अध्यापनामध्ये होणारा उपयोग, त्यासाठी आवश्यक उपक्रम आणि मूल्यमापन | 186 |
| 47. | प्रा. विक्रमसिंह बाबासो राऊत<br>प्रा.एस. एन. पाटील | शेणगाव गावातील वीटभट्टी उद्योगाचा आर्थिक आणि सामाजिक दृष्टिकोनातून अभ्यास | 191 |
| 48. | प्रा.डॉ.नितीन तुकाराम जाधव | महाराष्ट्रातील मुख्य आदिवासी जमातींचा तुलनात्मक अभ्यास | 196 |
| 49. | प्रा.डॉ. सुप्रिया अमर शिंदे | सामाजिक कार्यामध्ये परस्पर सहकार्य - एक अनिवार्यता | 199 |

| Sr. No. | Name of the Author | Title of Paper | Page No. |
|---|---|---|---|
| 50. | रमेश बापू कोरे<br>डॉ. शैलजा एस. मंडले | PRASHAST ची सर्वसमावेशक शिक्षणातील भूमिका (शिक्षक शिक्षणातील संशोधनात नवीन विचार प्रवाह) | 204 |
| 51. | डॉ.अरुण दामोदर नलवडे | एक राष्ट्र एक निवडणूक | 209 |
| 52. | डॉ. कन्नाडे एम. के. | कुटुंबसंस्थेतील लोकशाही | 212 |
| 53. | रंजना शिवाजी ओलेकर<br>डॉ.युवराज यशवंत पवार | प्राथमिक शिक्षण स्तरावरील मराठी विषयामधून सद्य:स्थितीत विकसित केल्या जाणाऱ्या सृजनशील कौशल्यांचा शोध-एक अभ्यास | 217 |
| 54. | प्रा. डॉ. देविदास विक्रम हारगिले | पर्यटनाची वाढ आणि त्याचा अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम | 227 |
| 55. | डॉ.रेणुका राजशेखर मेंगाणे | भारतीय लोकशाही एक अभ्यास | 232 |
| 56. | प्रा विजय जयसिंग माने | सर्वसमावेशक दृष्टीकोन मजबूत करण्यामध्ये सामाज कार्य शिक्षणाचे योगदान | 235 |
| 57. | प्रा. गौतमी कांबळे<br>प्रा. एस एन पाटील | भुदरगड तालुक्यातील मध उत्पादन- एक पर्यावरणपूरक व्यवसाय | 238 |
| 58. | प्रा. डॉ. दत्तात्रय कुंडलिक पाटील | मतिमंदत्वास कारणीभूत भौतिक वातावरणातील कारणे | 244 |
| 59. | श्री राहुल आनंदराव चित्रकार | रचनावादी शिक्षण पद्धती वर्गात अध्यापनामध्ये राबविण्यासाठी शिक्षकांना येणाऱ्या समस्या, आव्हाने व त्यावरील उपाय योजना | 250 |
| 60. | प्रा.डॉ.विक्रमराव नारायणराव पाटील | भारतीय लोकशाही पुढील आव्हाने व वाटचाल | 255 |
| 61. | संध्यादेवी रघुनाथ बाड<br>डॉ. लता शिवाजी पाटील | माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या निरोगी आरोग्यासाठी उत्तम भावनिक व्यवस्थापन क्षमता वृद्धीची गरज व महत्त्व | 259 |
| 62. | प्रा.महावीर सुरेश पाटील | राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि प्राकृत भाषा | 264 |
| 63. | सचिन विलास चौगले | उच्च शिक्षणातील शारीरिक शिक्षणाचे महत्त्व | 269 |
| 64. | प्रा. शिवाजी वसंत देसाई | राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मधील स्थानिक भाषाविषयक तरतुदी आणि संधी | 271 |
| 65. | प्रा. शत्रुघ्न शिवाजी पाटील | भारतातील पर्यटन व्यवसायाचा अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम | 274 |

| Sr. No. | Name of the Author | Title of Paper | Page No. |
|---|---|---|---|
| 66. | संजना संजय भालकर<br>प्रोफ.डॉ.प्रतिभा सदाशिव देसाई | माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांचे इंग्रजी विषयातील भाषिक कौशल्य व राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० | 279 |
| 67. | प्रा. तानाजी बाबासाहेब मोहिते | भारतीय इतिहास लेखन परंपरा-मार्क्सवादी इतिहास लेखन | 285 |
| 68. | श्रीकांत अनिल संकपाळ | मानवी विकासासाठी इतिहास लेखनामध्ये नवतंत्रज्ञान व विचारप्रवाह | 287 |
| 69. | प्रा.सतीश यशवंत चौगुले | नवीन शैक्षणिक धोरण 2020 आणि भाषाविषयक तरतुदी: संधी, आव्हाने आणि नकारात्मक बाजू | 290 |
| 70. | प्रा. मतिवडे अनिता वसंत<br>प्रा. काटकर मृदुला विठ्ठल | भाषिक कौशल्ये आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 : एक चिकित्सक अभ्यास | 294 |
| 71. | प्रा. विनोद मच्छिंद्रनाथ बर्डे | शिक्षक शिक्षणातील संशोधनात नवीन विचार प्रवाह: एक समीक्षात्मक अभ्यास | 299 |
| 72. | प्रा. आकाश विलास जाधव | २१ व्या शतकातील भारतीय लोकशाही पुढील आव्हाने | 303 |
| 73. | श्री. शैलेंद्र बजरंग गुंड | आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI) तंत्रज्ञान आणि ग्रंथालय व्यवस्थापन | 308 |
| 74. | सौ एस. जे. घाटगे | राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार उच्च शिक्षणाच्या गुणवत्ता संवर्धनासाठी मिश्र अध्ययन | 311 |
| 75. | प्रविणसिंह बहादूरसिंह शिलेदार | वर्तमानावर भाष्य  करणारी आणि भविष्याचा वेध घेणारी विज्ञान कादंबरी | 316 |
| 76. | सौ. रतिपौर्णिमा सागर खतकर | अर्थव्यवस्था आणि समाज | 322 |
| 77. | गुट्टे किशोर अनंतराव | १९६८, १९८६ आणि २०२० या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील भाषेविषयक तरतुदीच्या बदलांचा तुलनात्मक व चिकित्सक अभ्यास | 327 |

# कुटुंबसंस्थेतील लोकशाही

**डॉ. कन्नाडे एम. के.**
समाजशास्त्र विभागप्रमुख,
राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कोल्हापूर
email- swamimamata@gmail.com

**गोषवारा:**

*मानवाच्या संपूर्ण सामाजिक संस्थांमध्ये कुटुंबसंस्था ही एक आधारभूत व सर्वव्यापी सामाजिक संस्था आहे. सर्वच सामाजिक समूहात एक मूलभूत व प्राथमिक स्वरूपाचा कुटुंब हा एक सामाजिक समूह आहे. . न्याय, स्वातंत्र्य, समता व बंधुता ही लोकशाही जीवन पद्धतीची आधारभूत तत्वे मानली जातात. लोकशाहीची चर्चा करताना ती लोकशाही आधी कुटुंबामध्ये मिळणे गरजेचे आहे. कुटुंबामध्ये तर लोकशाही मिळत नसेल तर समाजामध्ये ती कशी लागू होईल. कारण कुटुंबापासून देशाच्या जडणघडणीला सुरुवात होत असते. आजही कुटुंबातील कर्ता व्यक्ती म्हणून पुरुषांनाच महत्त्व आहे. स्त्रियांनी घर सांभाळावे अशी अपेक्षा केली जाते. पाश्चात्य देशातून आपण पाश्चात्य संस्कृती स्वीकारली पण सामाजिक मूल्य मात्र आपण स्वीकारायला तयार नाही म्हणूनच राष्ट्रीय कुटुंब सर्वेक्षणासारख्या अहवालातून देखील नवऱ्याने बायकोला मारण्यात काही चूक नाही अशी प्रतिक्रिया बहुसंख्य पुरुषांनी आणि महिलांनीही दिलेली आढळते. व्यक्तिस्वातंत्र्य, न्याय आणि समता ही मूल्य जर कुटुंबातच विकसित झाली तर नक्कीच समाजातही ही मूल्य स्पष्टपणे पहावयास मिळतील.*

**प्रस्तावना :**

मानवाच्या संपूर्ण सामाजिक संस्थांमध्ये कुटुंबसंस्था ही एक आधारभूत व सर्वव्यापी सामाजिक संस्था आहे. सर्वच सामाजिक समूहात एक मूलभूत व प्राथमिक स्वरूपाचा कुटुंब हा एक सामाजिक समूह आहे. मानवी विकासाच्या सर्वच अवस्थांमध्ये कुटुंबाचे अस्तित्व दिसून येते. मानवी समाजाच्या विकास टप्प्यातील पहिली अवस्था म्हणजे कुटुंब होय. मानवी समाजाचा इतिहास म्हणजे कुटुंबाचा इतिहास होय. कुटुंबसंस्थेच्या निर्मितीमुळेच समाजातील स्थैर्य व सातत्य टिकून राहिले आहे. म्हणूनच कुटुंबसंस्थेला सर्व प्रकारच्या समाजात महत्त्वपूर्ण स्थान आहे.

अब्राहम लिंकननी लोकशाहीची व्याख्या केली लोकांनी, लोकांचे, लोकांसाठी चालवलेले राज्य म्हणजे लोकशाही होय. आज जगात सर्वात लोकप्रिय शासन प्रकार म्हणून लोकशाही शासन पद्धतीकडे पाहिले जाते. न्याय, स्वातंत्र्य, समता व बंधुता ही लोकशाही जीवन पद्धतीची आधारभूत तत्वे मानली जातात. लोकशाही जीवन पद्धतीत प्रत्येक व्यक्तीला तिच्या स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास घडवून आणण्याची संधी मिळवून देण्याची हमी असते. त्यामुळेच लोकशाही केवळ राजकीय क्षेत्रापुरतीच मर्यादित राहत नाही तर सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, कौटुंबिक इत्यादी सर्व क्षेत्रात लोकशाहीला स्थान प्राप्त झाले आहे.

भारत हा जगातील लोकशाही मानणारा सर्वात मोठा देश आहे. भारतामध्ये विविध प्रकारची विविधता ही आपणास पहावयास मिळते. अशा विविधतेने नटलेल्या देशाला एकसंघ ठेवण्याची किमया ही संसदीय लोकशाहीत आहे. लोकशाही म्हणजे 'लोकांची सत्ता'लोकशाहीमध्ये जनतेची इच्छा ही अंतिम आणि सर्वोच्च मानली जाते. म.गांधी म्हणतात, ' लोकशाही हा एक जीवनाचा मार्ग आहे'. इंग्लंड या देशाला संसदीय लोकशाहीची जननी म्हटले जात असले तरी तिथे सामाजिक व सांस्कृतिक भिन्नता तेवढी नाही जेवढी भारतामध्ये आहे. तरीही या विविधतेमध्ये एकता प्रस्थापित करण्यात भारतीय लोकशाही यशस्वी झाली आहे.

**संशोधन पध्दती:**

प्रस्तुत संशोधनासाठी माहिती संकलन आणि विश्लेषण पद्धतीचा अवलंब करून संशोधन विषयाशी संबंधित व्दितीय माहिती स्त्रोतांचा वापर करण्यात आलेला आहे. ज्यामध्ये विविध संदर्भग्रंथ, मासिके, विशेषांक, वर्तमान पत्रातील लेख, साप्ताहिक इ. आधारे हा शोधनिबंध तयार करण्यात आलेला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

- कुटुंब संस्था व लोकशाहीचा अर्थ समजून घेणे
- कुटुंबातील लोकशाही समजून घेणे
- कुटुंबातील पालकांची लोकशाही मूल्याबाबतची मानसिकता समजून घेणे
- कुटुंबातील लोकशाहीत येणारे अडथळ्यांचा अभ्यास करणे व उपाय सुचवणे

लोकशाहीची चर्चा करताना ती लोकशाही आधी कुटुंबामध्ये मिळणे गरजेचे आहे. कुटुंबामध्ये तर लोकशाही मिळत नसेल तर समाजामध्ये ती कशी लागू होईल. कारण कुटुंबापासून देशाच्या जडणघडणीला सुरुवात होत असते. आपण समाजात नेहमीच पाहतो की, एखाद्या मुला मुलीने स्वतःच्या इच्छेप्रमाणे जर लग्न केले तर त्यांना स्वतःच्या कुटुंबापासून दूर जावे लागते. काही वेळेला तर त्यांना जीव द्यावा लागतो किंवा त्यांच्या कुटुंबीयांकडून त्यांना संपविण्याचाही प्रयत्न केला जातो.

आजही कुटुंबातील कर्ता व्यक्ती म्हणून पुरुषांनाच महत्त्व आहे. स्त्रियांनी घर सांभाळावे अशी अपेक्षा केली जाते. पाश्चात्य देशातून आपण पाश्चात्य संस्कृती स्वीकारली पण सामाजिक मूल्य मात्र आपण स्वीकारायला तयार नाही म्हणूनच राष्ट्रीय कुटुंब सर्वेक्षणासारख्या अहवालातून देखील नवऱ्याने बायकोला मारण्यात काही चूक नाही अशी प्रतिक्रिया बहुसंख्य पुरुषांनी आणि महिलांनीही दिलेली आढळते. व्यक्तिस्वातंत्र्य, न्याय आणि समता ही मूल्य जर कुटुंबातच विकसित झाली तर नक्कीच समाजातही ही मूल्य स्पष्टपणे पहावयास मिळतील.

लोकशाहीचा विचार करताना कुटुंबातील लिंग आधारित स्तरीकरण ही गोष्ट देखील विचारात घेणे महत्त्वाचे आहे. कारण समाजाची विभागणी प्रामुख्याने जैविक तत्वावर असलेली पहावयास मिळते. यामुळे स्त्री-पुरुषात फार मोठे अंतरभेद लिंगभाव निर्माण होतो. अँथोनी गिडन्स यांनी लिंगभाव ही संज्ञा सामाजिक सांस्कृतिक घटकाशी संबंधित असल्याचे प्रतिपादन केले. त्यांच्या मते, "लिंगभाव ही संज्ञा पुरुष आणि स्त्रिया यांच्यातील मानसशास्त्रीय, सामाजिक व सांस्कृतिक भेदांशी संबंधित आहे. पुरुषीपणा आणि बायकीपणा याबाबतच्या समाजनिर्मित कल्पनांशी ही संज्ञा जोडलेली आहे."

लिंग ही जन्मजात बाब आहे. पण लिंगभाव मानवनिर्मित आहे. अनेक कुटुंबामध्ये असे दिसून येते की मुलीच्या जन्मापासून प्रत्येक टप्प्यावर ती वेगळी किंवा दुय्यम आहे याची सतत कुटुंबातून जाणीव करून दिली जाते. घरकाम, खेळ, शिक्षण, अन्न, आरोग्य, वंशाचा दिवा, म्हातारपणाचा आधार, परक्याचे धन इत्यादी बाबी मुलींच्या संदर्भात मनामध्ये रुजलेल्या आढळतात. यामुळे कुटुंबातील लोकशाहीस तडा जातो जर कुटुंबातच लोकशाही तडा जात असेल तर देशामध्ये ही लोकशाहीचे मूल्य दुर्लक्षित होताना पाहाव्यास मिळतात कुटुंबात स्त्रियांचा केला जाणारा छळ, अपमान, पिळवणूक यासारख्या घटना पूर्वीपासून चालत आलेले आहेत आणि प्रचलित नियमने यामुळे त्यांच्यावर होणाऱ्या अत्याचारात भरच पडत गेली. स्त्रियांसाठी केल्या जाणाऱ्या काही कायदेशीर तरतुदी स्त्री शिक्षणाचा प्रचार आणि काही प्रमाणात त्यांना मिळणारे आर्थिक स्वातंत्र्य या गोष्टी विचारात घेतल्या तरी असंख्य स्त्रियांना आजही अत्याचारांना बळी पडावे लागते.काही हिंसाचार, गुन्हे, अत्याचार हे प्रामुख्याने स्त्रियांविरोधी होत असतात. बलात्कार, लैंगिक अत्याचार, लैंगिक शोषण, लैंगिक दुरुपयोग, वेश्याप्रवृत्ती, कौटुंबिक अत्याचार आणि अश्लील वाङ्मयाचे प्रदर्शन ह्या मार्गाने स्त्रियांचा सतत छळ केला जात असतो. याबरोबरच, हुंड्याची पूर्तता न केल्याने, पुरेशा प्रमाणात आर्थिक मागण्यांची तडजोड न लावल्याने तरुण विवाहित मुलीचा छळ करणे, त्यांना मारहाण करणे, त्यांना मरणयातना भोगायला लावणे ह्या मार्गानेदेखील स्त्रियांविरोधी अत्याचार चालूच असतात. अलीकडच्या काही वर्षांत अशा स्वरूपाच्या हिंसाचारात प्रचंड वाढ होताना तर दिसतेच आहे, शिवाय अशा त-हेची हिंसात्मक प्रवृत्ती सतत वाढतही आहे. ही एक प्रकारची कुटुंबातील व समाजातील विकृत हुकूमशाहीच आहे.

कौटुंबिक हिंसाचार, आईवडिलांच्यात होणारे भांडण, नातेवाईकांकडून त्यांच्यावर होणारे भेदभावजनक अन्याय व मुख्यतः लैंगिक अत्याचार हा आणखी एक पैलू. जगभर झालेल्या वेगवेगळ्या पाहण्यांतून 80% लैंगिक अत्याचा हे घरातील व्यक्ती वा परिचित यांच्याकडून होत असल्याचे दिसून येते. ते करणाऱ्यांकडून त्याबद्दल वाच्यता न करण्याची सक्ती केलेली असतेच, परंतु त्याहून दुर्दैवाची बाब म्हणजे, जरी मुलांनी हिम्मत करून कुटुंबातील व्यक्तींना सांगितलीच, तरी त्यांच्यावर विश्वास ठेवला जात नाही. बालवयात असे अनुभव घेतलेल्या मुलांना आपण कोणत्या तोंडाने लोकशाही मूल्ये शिकवणार? म्हणून, आईवडिलांनी व इतर पालकांनी स्वतः लोकशाही मूल्यांचा अवलंब करणे, घरामध्ये लोकशाहीचे वातावरण निर्माण

करणे व ते टिकवून ठेवणे आवश्यक आहे. घरातील कोणत्याही प्रकारचे वर्तन मूल फार लवकर आत्मसात करते. माझे आईबाबा स्वतःही असे वागतात, म्हणजे ते चांगले आहेत, हे समीकरण जर मनात पक्के बसले असेल, तरच पुढील मार्ग सोपा होतो.

घरातील मुलांना किंवा मुलींना शाळेत रस्त्यावर, दुकानात, पाहुण्यांच्या घरी किंवा स्वतःच्या घरी झालेल्या अन्यायाबाबत तक्रार करायची असेल तर कुटुंबातील मोठ्या व्यक्तींना लहान मुलाचं ऐकून घ्यायची इच्छा नसते. घरातील मोठेही 'गप्प बस' अशा सूचना देतात. घरात वृद्ध व्यक्तींनी जे सांगितले ते ऐकून त्याप्रमाणे वर्तन करणे याला आदर्श मानले जाते. आणि अशा मुलांना आपण आज्ञाधारक असे मानतो. मूल स्वतःच्या विचाराप्रमाणे वर्तन करीत असे तर त्याला उद्धट समजले जाते. कुटुंबातील लोकशाहीमध्ये मुलांनाही बोलायचे, मत मांडण्याचे अधिकार आहे. शिवाय कलम नंबर 12 मध्ये तशी तरतूद केलेली आहे. अलीकडे समाजामध्ये ज्या पद्धतीने मुले मुली अत्याचाराला सामोरे जात आहेत त्या परिस्थितीत पालकांचे आद्य कर्तव्यच आहे की घरामध्ये लोकशाहीचे वातावरण निर्माण करणे व जोपासणे.

मुलांमध्ये लोकशाही मूल्य रुजवताना या लेखात भाषा सल्लागार समितीच्या सदस्य अनुराधा मोहनी यांनी म्हटल्याप्रमाणे, 'आपल्या आवडीप्रमाणे वागण्याचे स्वातंत्र्य मोकळेपणाचा व हलकेपणाचा अनुभव देते, पण स्वातंत्र्य म्हणजे स्वतःच्या जगण्याविषयीची कल्पना स्पष्ट होणे आणि नंतर तशा प्रकारे जगण्याची मोकळीक मिळणे, एवढेच नव्हे, तर असंख्य बंधनांतून आणि बेड्यांतून आपले मानस मुक्त होणे आणि मोकळेपणाने विचार करता येणे. कोणतेही काम करणारा, कोणत्याही जातिधर्माचा पुरुष किंवा स्त्री ह्यांच्याशी त्यांचा आत्मसन्मान जपणारी वागणूक ठेवण्याने तशाच आत्मसन्मानाचा अनुभव स्वतःलाही येतो; हे झाले समतेचे मूल्य. आपल्या परिचितांशी प्रत्यक्षपणे व अपरिचितांशी अप्रत्यक्षपणे, जिव्हाळ्याने जोडून घेतल्याने आपल्यालाही सुरक्षिततेचा अनुभव येतो; त्याला म्हणायचे बंधुता. अन्याय-अत्याचारांचे परिमार्जन घडविल्याने आपली न्यायाची बाजू बळकट होते. ह्यावरून दिसते की, लोकशाही मूल्ये ही फक्त इतरांकडून करायची वर्तणुकीची अपेक्षा नाही. तसेच, इतरांशी वागताना पाळावयाची आचारसंहिताही नाही, तर त्या कृतीतून आपल्यातही परस्पर सौहार्दाची, सामूहिकतेची जाणीव करून देणाऱ्या लोकशाही मूल्यांची जोपासना होते.'

आपले घर, कुटुंब, शाळा काही अपवाद वगळता तिथेही आपल्याला लोकशाही पहावयास मिळत नाही. बहुतांश शाळेच्या वर्गामध्ये पाहिले तर शिक्षकांचच वर्चस्व पहावयास मिळतं. शिक्षकांनी सांगायचं आणि मुलांनी ऐकायचं. इथे मुलांना बोलायला शिकवले जात नाही तर गप्प बस अशा सूचना दिल्या जातात. मुलाचं मत आपल्या विचारांशी विसंगत असेल तर त्याच्यावर हात न उचलता किती पालक चर्चा करतात, जातीबाहेर केलेला प्रेम विवाह किती पालक मुक्तपणे स्वीकारतात, आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाह केल्यामुळे कितीतरी पालक किंवा भाऊ आपल्या मुलीला किंवा बहिणीला मारून टाकतात व यांचा त्यांना संस्कृती जोपासण्याचा अभिमान वाटतो तेथे कुटुंबातील मुला - मुलींना निर्णय स्वातंत्र्य मिळतो का? आपल्या समाजातील लेसबियन, गे, बायसेक्सुअल मुला मुलींना त्यांच्या इच्छेप्रमाणे वागण्याची परवानगी समाज देत नाही. आपला कायदा सुद्धा आतापर्यंत हे वर्तन अनैसर्गिक आणि गुन्हेगारी स्वरूपाचे मानत होता, मतदार ओळखपत्र मिळण्यासाठी त्याची किती परवड होते हे पाहिले की लोकशाहीत समान नागरिक म्हणून त्यांना जगता येण्याचा प्रवास किती अवघड आहे याची कल्पना येते. मुलांमध्ये लोकशाही मूल्य रुजवायची असतील तर आधी पालकांमध्ये असायला हवीत. भारतीय पालक हे काही अपवाद वगळता सरजामी मानसिकतेचे आणि पितृसत्ताक व्यवस्थेचे प्रतिनिधी आहेत. कुटुंबातल्या स्त्रियासुद्धा या मानसिकतेला अपवाद आहेत असं म्हणता येणार नाही कुटुंबातील मुलाला इंग्रजी माध्यमात- मुलीला प्रादेशिक भाषेत, मुलाला विज्ञान शाखेत - मुलीला कला शाखेत, मुलाला हॉस्टेलमध्ये - मुलीला घरी, मुलाला नोकरीसाठी - मुलीला गृहिणी म्हणून वागवण्याचा विचार करणारे सगळीकडे दिसतात. तेव्हा कुटुंबातल्या लोकशाहीला तडा जातो. शिक्षण व लोकशाही या एकाच राहण्याच्या दोन बाजू आहेत. केवळ शिक्षणामुळेच लोकशाही बळकट राहू शकते.

लोकशाही समाजात राहून तिच्यात सहभागी होण्याचा अधिकार राज्यघटनेने मुलाला दिलेला आहे. कलम 5 मध्ये मुलांच्या हळूहळू आकारास येणाऱ्या क्षमतांची मोठ्यांकडून योग्य ती बूज राखली जाण्याचा अधिकार. कलम 9 मध्ये मुलाचे मत विचारात घेतल्याशिवाय त्याला त्याच्या कुटुंबापासून विलग न करण्याचा अधिकार. कलम १२ मध्ये मुलाचे म्हणणे ऐकून घेतले जाण्याचा आणि ते गंभीरपणे घेतले जाण्याचा अधिकार.कलम १४ मध्ये सदसद्विवेकबुद्धी, विचार आणि धर्म याबाबतचा

अधिकार, कलम १५ मध्ये संघटना बांधण्याचा अधिकार, कलम १६ मध्ये खाजगीपणाचा अधिकार, कलम १७ मध्ये माहितीचा अधिकार देण्यात आलेला आहे.

कायद्याने समाज बदलतो का, मानसिकता बदलते का, यावर प्रबोधन-चळवळीच्या काळापासून जगभरात चर्चा होत आलेली आहे. अशा कायद्यामुळे समाज तांत्रिकदृष्ट्या बदलल्यासारखा वाटला तरी प्रत्यक्षात बदलतो असं नाही. प्रत्यक्ष बदलाची प्रक्रिया दीर्घकाळ, संथ चालणारी आणि अनेक पदर असलेली आहे. त्यामुळेच लग्नाआधीच शरीरसंबंधांसाठी तयार होणारा एखादा पुरुष जन्माला घातलेल्या मुलाची जबाबदारी घ्यायला तयार होत नाही. यासाठी अलीकडच्या काळात मुलांची डीएनए चाचणी करण्यापर्यंत वैज्ञानिक प्रगती झाली आहे. तर दुसरीकडे गर्भाचं लिंगनिदान करण्यावर कायद्याने बदी आली आहे. याचा अर्थ, लोकांचं वैचारिक परिवर्तन झालेलं आहे असं नाही, पण कायद्याने किमान काही लोकांना चाप बसला आहे. तरीसुद्धा वैद्यकीय पेशाला आणि पालकत्वालाही काळिमा फासणाऱ्या मुलीची भ्रूणहत्या करण्याच्या किंवा नवजात अर्भकाच्या हत्या करण्याच्या घटना संख्येने कमी नाहीत. ज्या वेळेला आपण स्त्रीभ्रूणहत्या करतो त्यावेळेला आपण मुलींचा जन्म नाकारतो. आजही मुलांच्या जन्माचे ज्या पद्धतीने स्वागत केले जाते त्या पद्धतीने मुलींच्या जन्माचे स्वागत होईलच याची शाश्वती नाही. कुटुंबातील ही मानसिकता लोकशाही नाकारणारी आहे.

**कुटुंबातील लोकशाहीत येणारे अडथळे:**

लोकशाहीचा जागर करणारे सर्वच प्रत्यक्ष वर्तनात लोकशाहीवादी असतातच असं नाही. त्यामुळे वैयक्तिक, सामूहिक विचारांमध्ये आणि आचरणात अ-लोकशाहीवादी असलेल्या व्यक्तींना आणि समूहांना लोकशाही वळणावर आणणं, हे खरं आव्हान आहे.

प्राचीन रोममध्ये ज्याप्रमाणे ग्लॅडिएटर एकमेकांशी लढत असत आणि त्यातल्या एकाने दुसऱ्याचा घेतलेला बळी, लोक आनंदाने चेकाळून जात अनुभवत असत; तसं आजच्या समाजमाध्यमांचं झालं आहे. रूढार्थाने ज्याला ट्रोलिंग म्हणतात, ती लोकशाहीविरोधी किंबहुना माणुसकीविरोधी कृती आहे. जोपर्यंत एखादी व्यक्ती आपला विश्वास असलेल्या भूमिकेच्या समर्थनार्थ आक्रमकपणे युक्तिवाद करते, तोपर्यंत ते क्षम्य आणि समर्थनीय असतं. पण, एका टप्प्याला जमावाने आपली नखं बाहेर काढून भूमिका मांडणाऱ्या व्यक्तीला बोचकारून, घायाळ करून संपवणं हे लोकशाही पुढील मोठे आव्हान आहे.

कुटुंबातील लोकशाही मधील सर्वात मोठा अडथळा म्हणजे पुरुषप्रधान संस्कृती होय. बुद्धिमत्ता, शारीरिक क्षमता, सर्जनशीलता, कष्ट करण्याची धमक इत्यादी बाबत पुरुषांपेक्षा स्त्रिया कमी नसतानाही स्त्रीला पुरुषांपेक्षा कमी लेखण्याची वृत्ती या संस्कृतीत पहावयास मिळते. स्त्री ही पुरुषांची मालमत्ता आहे तिचा वाटेल तसा उपयोग करू शकतो ही मालकी हक्काची अमानुष भावना पाहायला मिळते त्यामुळे कुटुंबातील लोकशाही मोडकळीस येते.

स्त्रीच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण पुरुषप्रधान समाजात झालेली असल्यामुळे समाजाने दिलेले बाईपनाचे गुण घेऊनच ती लहानाची मोठी होत असते, स्त्रीच्याही मनात खरोखरच पुरुष आपल्यापेक्षा श्रेष्ठ आहे आपणास पुरुषाचे संरक्षण कवच हवे असते असे वाटू लागते. या मानसिकतेचा फायदा पुरुष घेतात व ते स्त्रियांवर अधिकार गाजवतात त्यामुळे कुटुंबात लोकशाही निर्माण होत नाही.

**उपाय**

"अशी कोणतीही मानवी संस्था नाही, जिच्यात दोष नाही. एखादी संस्था जितकी मोठी असते, तितका तिचा दुरुपयोग होण्याच्या शक्यता वाढतात. लोकशाही ही एक व्यापक संस्था आहे आणि म्हणूनच तिचा मोठ्या प्रमाणात दुरुपयोग केला जाऊ शकतो. पण, त्यामुळे लोकशाहीच नाकारणे हा उपाय नव्हे, तर तिचा दुरुपयोग होण्याच्या शक्यता कमीत-कमी ठेवून लोकशाही टिकवून ठेवता येईल." - महात्मा गांधी

मुळामध्ये सर्व माणसं सारखी आहेत आणि त्यांना व्यवस्थेचे सारखे फायदे मिळाले पाहिजेत, हे लोकशाहीपुढचं गृहीतक आहे. मात्र प्रत्यक्षात तसं घडतंच असं नाही, त्यामुळे ते घडविण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागतात. समाजाची पुनर्निर्मिती करण्यासाठी, समाज सुधारण्यासाठी लोकशाहीचा मार्ग महत्त्वाचा आहे. ती लोकशाही कुटुंबामध्ये बिंबवणे देखील तितकेच महत्त्वाचे आहे. यासाठी खालील उपाय सुचविता येतील -

ज्याप्रमाणे समाज प्रबोधनासाठी अण्णाभाऊ साठे, अमर शेख, शाहीर गवाणकर, शाहीर साबळे, शाहीर विठ्ठल उमप इत्यादींनी आपल्या कलेचा वापर समाज प्रबोधनासाठी केला त्याप्रमाणे कीर्तनकार आणि शाहिरांनी लोकशाही मूल्य समाजामध्ये बिंबवण्याचा प्रयत्न कलेच्या माध्यमातून करणे गरजेचे आहे.

**कायद्याचे सहाय्य :** समाजामध्ये लोकशाही निर्माण करण्यासाठी विविध कायदे आहेत. त्याच कायद्याची जर व्यवस्थित अंमलबजावणी झाली तर कुटुंबामध्ये ही लोकशाही निर्माण होऊ शकते.

**लोकशिक्षण :** कुठलीही गोष्ट प्रत्यक्षात उतरवायची असेल तर कायदा असणे आवश्यक आहे त्याचबरोबर लोकशिक्षण व लोक जागृती याची देखील आवश्यकता आहे. कुटुंबातील लोकशाहीचे महत्त्व समाजाला पटणे गरजेचे आहे. त्यासाठी विविध वृत्तपत्रे मासिके आणि समाज माध्यमातून जागृती होणे गरजेचे आहे.

**स्त्री शिक्षण व स्वावलंबन :** कुठलाही व्यक्ती शिक्षणामुळे स्वावलंबी होतो. तेव्हा सर्व स्त्रियाला जर शिक्षण मिळाले, ती जर स्वतःच्या पायावर उभी राहिली तेव्हा तिच्यावर अधिकार गाजविण्याची पुरुषाची भावना कमी होईल, स्त्रीला वाटणारी भीती कमी होईल, तिच्या स्वावलंबनामुळे तिच्यात आत्मविश्वास निर्माण होईल व याचा परिणाम कुटुंबामध्ये लोकशाही वातावरण निर्माण होइल.

**पुरुषांच्या मानसिकतेत बदल :** पुरुषांच्या मनामध्ये स्त्रीबद्दल जी अमानवी विचारसरणी आहे ती बदलणे अत्यंत महत्त्वाचे आहे. प्रत्येक पुरुषांनी जर आपल्या पत्नीसोबत मैत्रीपूर्व व्यवहार केला तर त्याचे अनुकरण त्या कुटुंबातील मुलही करतील आणि आपोआपच कुटुंबामध्ये लोकशाही ची बीजे पेरले जातील.

**सारांश**

आपल्या देशात 'लोकशाही' फक्त राज्यव्यवस्थेत आणि तीदेखील निवडणूक प्रक्रियेपुरतीच मर्यादित राहिली आहे. आपण एक मूल्यव्यवस्था म्हणून लोकशाहीचा स्वीकार केलेलाच नाही. लोकशाही मूल्यं आपल्या जीवनपद्धतीचा अविभाज्य भाग बनलेली नाहीत. समाज आणि संस्कृती यांचं वळण लोकशाहीपर नसल्याने लोकशाही पद्धतीचे संविधान स्वीकारले तरी लोकशाही रुजणं आणि टिकणं अवघड आहे. म्हणून खासगी आणि सार्वजनिक पातळीवर विशेष प्रयत्न करावे लागतील. लहानपणापासून लोकशाहीवर आधारित वर्तनाचा सराव मुलांना कुटुंबातून आणि शाळेतून मिळायला पाहिजे. बदलाची सुरुवात आपल्या कुटुंबातच झाली पाहिजे - मोकळेपणाने प्रश्न विचारणं, मत व्यक्त करणं आणि आपसातील मतभेदांचा आदर करणं यांची कुटुंबापासून सवय लागली पाहिजे. व्यक्तिस्वातंत्र्याला घाबरून चालणार नाही. एकाधिकारशाही मोडावी लागेल. मोठ्या माणसांनी आपसात वागताना लोकशाही मूल्यं जपावी लागतील. पुरुषांना घरकामात सहभाग घ्यावा लागेल, घरातले लहानमोठे निर्णय सर्वांच्या सोबत चर्चा करून, सर्वांच्या सोयीने आणि सामंजस्याने घ्यावे लागतील, शारीरिक क्षमता किंवा लिंगावर आधारित भेदभाव केला जाणार नाही, याकडे लक्ष द्यावं लागेल. नव्या पद्धतीने कुटुंब घडवण्यासाठी अनेक नव्या पद्धती, कामाची नवी विभागणी, नवे नियम तयार करावे लागतील. अर्थातच, हे एका रात्रीत होऊ शकणारे बदल नाहीत. एखाद-दुसऱ्या कुटुंबात असे बदल घडूनही फारसा उपयोग नाही आणि केवळ कुटुंबाच्या पातळीवर थांबून चालणार नाही. कुटुंबासोबत शाळा, प्रसारमाध्यमं, सरकारी कार्यालयं, बँका, अशा अनेक ठिकाणी वर्तन-संस्कृतीमध्ये बदल करावे लागतील. तेव्हा कुठे स्थानिक स्वराज्य संस्था, राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर बदल होण्याची आशा ठेवता येईल.

**संदर्भ ग्रंथ**

1. Indian Strems Research Journal volume 3 April 2013
2. व्होरा राजेंद्र आणि पळशीकर सुहास (संपादित) 2010, 'भारतीय लोकशाही: अर्थ आणि व्यवहार,' डायमंड पब्लिकेशन्स, पुणे
3. साबळे आर. डी. 2004, ' भारतीय शासन आणि राजकारण' हिमालया पब्लिशिंग हाऊस, नागपूर
4. दीपक पवार (संपादित), 2022, ' लोकशाही समजून घेताना' मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय, महाराष्ट्र राज्य मंत्रालय, मुंबई
5. साधना
6. प्रतियोगिता दर्पण